Research Paper Literature

Aacharya Vinoba Bhave Yanche Aloukik Karya - BHUDAN

vkpk;l foukck Hkko ;kp vykfdd dk;l & Hknku

Pravina Rajendra Patil

Vivekananda colony, vidarbha mill near safalyabichayat, Kendra AchalpurTq. Achalpur Dist.-Amravati -444806(MH)

KEYWORDS

आचार्य विनोबा भावे हे भूदान चळवळीचे प्रवर्तक व विचारवंत सत्य, अहिंसा, ब्रम्हचर्य तत्वे ते प्रत्यक्ष जीवनात बाळगून जगले. गांधीजींच्या तत्वज्ञानाचे ते पाईक, खरे सेवक होते. आचार्य विनोबा भावे ही एक असामान्य व्यक्ती होती. प्राचीन भारतीय विद्या व परंपरा ह्यांनी त्यांचे जीवन ओतप्रोत झालेले होते. त्यांच्या जीवनात विद्वत्ता, अध्यात्मिक दृष्टीकोन ह्यांचा मनोहर संगम झालेला दिसून येतो. विनोबाजींचा जन्म 11 नोव्हेंबर 1895 रोजी कोकणातील गागोदे या गावी झाला. गागोदे या छोटयाशा खेडयात प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर 1916 साली इंटरची परिक्षा देण्यासाठी ते मुंबईला जायला निघाले परंतु जिज्ञासापोटी त्यांनी काशीला प्रयाण केले. काशी हिंदु विश्वविद्यालयाच्या समारंभातील महात्मा गांधीच्या भाशणाचा प्रभाव विनोबावर झाला. परिणामी गांधीजीशी झालेल्या संपर्काचा त्यांच्या जीवनावर नैतिक व अध्यात्मिक असा फार खोल परिणाम घडून आला.

गांधीजींच्या मृत्युनंतर विनोबा त्यांच्या ध्येयाचा प्रसार व प्रचार करीत राहीले.ह्या त्यांच्या श्रध्देचा नैसर्गिक परिणाम म्हणजे 'भूदान चळवळीचा' उगम होय. गांधीजींच्या कोचरब आश्रमातूनच खऱ्या अर्थाने त्यांच्या राष्ट्रीय चळवळीच्या कार्याला सुरूवात झाली. भारतीय स्वातंत्र्य लढयातील सविनय कायदेभंगाच्या चळवळीत वैयक्तीक सत्याग्रहाचे ते पहिले मानकरी ठरलेत.

भूदान –

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर भारतात अनेक सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक चळवळी उदयास आल्या त्या चळवळीपैकी एक महत्वाची चळवळ म्हणजे 'भूदान चळवळ' होय. भूदान म्हणजे जमीन दान देणे होय. ''भूधारकांनी आपल्या जमिनीपैकी काही जमीन, जमिन नसलेल्या भूमिहिनांना दान द्यावी यासाठी विनोबा भावे यांनी सुरू केलेली चळवळ म्हणजे भूदान चळवळ होय.'' भूदान चळवळ ही सुधारणावादी चळवळ होती. युरोपियनांचा प्रभाव म्हणून भारतात सुध्दा विषमता निर्माण झाली होती. या विषमतेमध्ये आर्थिक विषमता ही मोठयाप्रमाणात होती. या चळवळीद्वारे कष्टकरी लोकांना जगण्याचे साधन मिळाले.

भारतात मुख्य असलेल्या शेती या व्यवसायात सुध्दा या काळात मोठया प्रमाणात विषमता निर्माण झाली होती. येथील काही जमिनदारांकडे हजारो एकर शेती तर काही व्यक्तीकडे 1 गुंठासुध्दा शेती नव्हती. या विषमतेला कायद्याने सुध्दा मिटविणे अशक्य झाले होते. कारण कायद्याने अनेक पळवाटा निर्माण झाल्या होत्या. अशा वेळी विनोबा भावे यांनी अप्रतिम अशा आंदोलनास सुरूवात केली. आंदोलनच नव्हे तर ती एक चळवळ होती ती म्हणजे भूदान चळवळ होय. देशामध्ये या भुदान चळवळीने एक क्रांतीकारी बदल घडून आला.

आर्थिक विषमतेचा सर्वप्रथम स्फोट झाला तो तेलंगणात येथे जमीनदार भूदासांना आपल्या जमिनीवर अल्पशा मजुरीवर राबवून घेत असत. भूमिहीन मजुरांची स्थिती अतिशय हलाखीची, दयनीय अशी होती. परिणामी भूमिहिन शेत मजुरांनी जमीनदारांच्या विरूध्द संघटीत होण्यास सुरूवात केली. विनोबा भावे 'सर्वोदय' आंदोलनाच्या निमित्ताने तेलंगणा येथील पोचमपल्ली येथे आले असता त्यांना तेथील शेतकऱ्यांमध्ये शेतीबाबत फार मोठा संघर्ष आढळून आला. तेव्हा विनोबा भावे यांच्या मनात विचार आला की, जर आपण हजारो एकर शेती असलेल्या शेतकऱ्यांकडून थोडयाप्रमाणात जमीन दान मिळविली आणि ती भूमिहिन शेतकऱ्यांना दिली तर संघर्ष आपोआप मिटेल. विनोबा भावे यांनी हा विचार कृतीत आणण्याचा प्रयत्न केला. पोचमपल्ली येथील शेतकरी 'रामचंद्र रेड्डी' यांना त्यांच्याकडील जमीन दान मागितली असता रेड्डी यांनी थोडेही मागेपुढे न करता शंभर एकर जमीन विनोबा भावे यांना दिली. ही जमीन त्यांनी भूमिहिन शेतकऱ्यामध्ये वाटली. येथूनच 12 एप्रिल 1951 पासून विनोबा भावे यांच्या भूदान यात्रेला सुरूवात झाली आणि ती पुढे 13 वर्षे अविरत चालली. भूमी वितरणाची प्रक्रिया करीत असताना विनोबा भावे गावात ग्रामसभा बोलवित. गावातील सर्व हरिजनांना या ग्रामसभेत आवर्जून बोलविले जाई. उपस्थितांपैकी सर्वात गरजू व्यक्तींची निवड केल्या जाई. जर जमीन कमी आणि शेतकरी जास्त असेल तर भूमिहिन शेतकऱ्यांच्या नावाच्या चिठ्ठया तयार करून एका भांडयात टाकल्या जात असे. आणि त्यामधून शेतकऱ्यांची निवड होई.

भूदान चळवळ ही तेलंगणापुरती मर्यादिन न राहता संपूर्ण भारतात सर्वदूर पसरली मार्च 1957 ला भुदानात मिळविलेल्या जमिनीचा आकडा हा 42 लक्ष 72 हजार एकर एवढया पर्यंत पोहचला. भूदान चळवळीला प्रतिसाद बघता विनोबा भावे यांनी भारतभर पायपीट करून छोटे शेतकरी तसेच जमिनदारांचे हृदय परिवर्तन करून त्यांच्याकडून जमीन मिळविली. मिळालेली जमीन भूमिहीन शेमजुरांना मोफत दिली. परिणामी जमीन घेणाऱ्यांच्या आर्थिक स्थितीत अल्पावधीतच बदल झाला. त्यामुळे शेतकऱ्यांना आनंदाने जीवन जगता आले. विनोबा भावे यांची 'भूदान चळवळ' ही संपूर्ण भारतभर पसरली या चळवळीचे स्वरूप फार मोठे आहे. विनोबा भावे यांच्या भूदान कार्याचा संपूर्ण देशावर विलक्षण प्रभाव पडला. आर्थिक समस्या सोडविण्यासाठी अहिंसात्मक आणि नैतिक मार्गाचा अवलंब किती प्रभावी ठरू शकतो हे लोकांच्या दृष्टीत्पत्तीस आले. त्या काळात भूदान चळवळीने मोठा चमत्कार करून दाखविला लोक यास 'भूदान–यज्ञ' म्हणू लागले. जगाच्या इतिहासातील ही एक विलक्षण घटना म्हणावी लागेल.

विनोबांचे सारे जीवन समाजासाठीच वाहिलेले होते. त्यांनी स्वतःच्या गरजा कमीत कमी ठेवण्याचा प्रयत्न केला. सृष्टीच्या रीतीप्रमाणे जन्म–मृत्यु याचे धनी आपण नसतो ही त्यांची धारणा होती. आयुष्यात आपल्याकडे जे येते ते सर्वांचे आहे अशी भावना त्यांनी बाळगली होती. जेव्हा विनोबाचे वडील वारले तेंव्हा वारसा हक्काने नरहरीपंतानी विनोबांना रू. 25000, भरपूर पुस्तकांचे ग्रंथालय आणि 450 एकर जमीन एवढी संपत्ती मागे ठेवली होती. या घटनेनंतर विनोबांनी मालमत्तेचे त्यांच्या पध्दतीने लोकांमध्ये वाटप करून एक आदर्श उदाहरण समाजापुढे ठेवले. 12 एप्रिल 1951 पासुन विनोबाजींनी स्वतःला भूदानयज्ञाच्या कार्यात पुर्णतः झोकून दिले. त्यासाठी त्यांनी सुमारे 42 हजार मैल पदयात्रा केली. शांततेचा मार्ग अवलंबून सर्वोदय साधण्याचा प्रयत्न केला. तेरा वर्ष, तेरा महिने, तेरा दिवस अशी ही पदयात्रा झाली. भूदान, ग्रामदान, प्रखंडदान, जीवनदान अशी दाने मिळत गेली.

भूदानातून ग्रामदानाचा झालेला विकास –

ग्रामदान म्हणजे गावांतील सर्वच जमीन मालकांद्वारे त्यांच्या सर्व जमिनीचे दान आणि नंतर त्यांचे सम वितरण, ग्रामदानात जमिनीची मालकी आता संपूर्ण गावाची मानली जाई आणि केवळ शेती करण्याचा अधिकार जमीन प्राप्तकरांना होता. ही सामान्य गोष्ट नव्हती. शंभर एकर जमीन असलेल्या जमीन मालकाने आपली संपूर्ण जमीन दान देणे आणि नंतर तिच्या सम वितरणाअंती केवळ पाच–सात एकर जमिनीवर संतोष मानने, अशी घटना इतिहासातही कधी घडली नव्हती. या ग्रामदानामुळे संपूर्ण गावातील जमिनीचे ग्रामीकरण होत होते. जमिनीची मालकी पूर्ण गावाची होत असे आणि गावातील लोकांनी सर्वांनी मिळून या जमिनी श्रमाच्या तथा बुध्दीच्या आधारावर पिकवून गावाचा सर्वांगीण विकास करावा किंवा त्या दृष्टीने प्रयत्न करावे असे ठरविले गेले. ग्रामदानामुळे गावात गरीब–श्रीमंत हा भेद नष्ट झाला. समानता प्रस्थापित होण्यास मदत झाली.

विनोबा भावे यांची भूदान–पदयात्रा संपूर्ण भारतभर सुरू असताना उत्तर प्रदेशातील मंगरौठ या गावी 24 मे 1952 रोजी गावातील सर्व छोटे–मोठे शेतकऱ्यांनी गावातील संपूर्ण जमीन भूदानात अर्पण केली. हे भारतातील पहिले ग्रामदान होय. मंगरौठ 107 कुटूंबियांच गाव होत. ज्यात 67 कुटूंबाकडे जमीन होती आणि 40 कुटूंब भूमिहिन होते. मंगरौठ नंतर दुसरे ग्रामदान ओरिसामधील मानपूर या ठिकाणी 30 जानेवारी 1953 रोजी झाले आणि नंतर ग्रामदानाची श्रृंखला सुरू झाली. केवळ ओरिसातच नव्हे तर संपूर्ण देशभर मोठया संख्येने ग्रामदान मिळू लागली. महाराष्ट्रातील 432 ग्रामदाने मिळाली. तामिळनाडूमध्येही मोठया प्रमाणात ग्रामदाने मिळाली. ग्रामदानाचा विकास पाहुन विनोबाजींनी अहिंसात्मक समाजरचनेच्या मार्गातील 'ग्रामनिर्माण' आणि 'ग्रामस्वराज्य' या संकल्पनांचे महत्व समजावून सांगण्यास सुरूवात केली.

भूदानातील भूमि वितरणाची प्रक्रिया –

भूमिहिनांची जमिनीची समस्या सोडविण्यासाठी आणि सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी विनोबाजींनी भूदान आंदोलनास सुरूवात केली आणि या चळवळीस भरघोस यश प्राप्त होवून मोठया प्रमाणावर जमिनी मिळू लागल्या परंतु प्राप्त जमिन आणि तिचे वितरण यांचा मेळ होत नव्हता. सुरूवातीला दानात मिळालेल्या जमिनीवर सामुहिक शेती करावी हा विचार होता. परंतू नंतर हा विचार मागे पडून व्यक्तीगत शेतीला मान्यता देण्यात आली. भूमिदान ज्या गतीने प्राप्त होत होते. त्या गतिने जमिनीचे वितरण करणे त्यावेळी शक्य नव्हते. कारण पदयात्रा पुढे नेणे जरूरीचे होते. भूमि वितरण प्रक्रियेचा प्रश्न बिकट बनत गेला तेव्हा विनोबा भावे यांनी भूदात्याकडून दान पत्राऐवजी जमिन ज्याला मिळाली त्या भूमिहीनांकडून प्राप्तीपत्र घ्यावयास सुरूवात केली. विदर्भातील कार्यकर्त्यांनी या दिशेस ठोस पाऊले उचलली 1956 मध्ये चाळीस शिबिरांचे आयोजन केल्या गेले त्यात 3200 लोकांना प्रशिक्षित करून 1100 गावांमध्ये

जमिनीचे वितरण करण्यात आले.

भूदानामध्ये एकुण जवळ जवळ 49 लाख एकर जमिन मिळाली. भू–वितरण ामध्ये अनेक अडचणी असतांना देखील भू–वितरण मोठया संख्येने झाले. अधिकांश भूमिहिनांना जमिन मिळाली. भूदान यात्रेद्वारे विनोबाजींनी भारतभर अखंड पदभ्रमण केले भारतातील पूर्व–पश्चिम, उत्तर–दक्षिण प्रदेशांनी एका आधुनिक ऋषीची एक ध्यास घेवून चाललेली पवित्र यात्रा पाहिली. ध्यास होता हृदयपरिवर्तनाचा आणि त्यातून समाजपरिवर्तनाचा विनोबाजींची पदयात्रा म्हणजे एक 'जंगम विद्यापीठच' असे त्यात विविध विचारांनी भरलेली प्रवचने असत. निरनिराळया पातळीवरचे सुमारे चाळीस ते पन्नास स्त्रीपुरूष, विद्यार्थी नेहमी सामील असत. जगात सर्वत्र या पायी चालण ाऱ्या व 'गरीबांना' जमीन वाटणाऱ्या संताबद्दल कुतूहल निर्माण झाले. इंग्लडचे शांतीवादी डोनाल्ड ग्रुमसारख्या अनेक शांतीवादी लोकांनी विनोबाच्या पदयात्रेत भाग घेतला. अहिंसेच्या शांततेच्या मार्गाने सर्व समस्या सुटू शकतात हे विनोबाजींनी भूदान चळवळीद्वारे सिध्द करून दाखवले. म्हणजे सर्वोदय आंदोलनाचे फलित होते.

मूल्यमापन –

आचार्य विनोबाजी भावे एक सच्चे देशभक्त होते. देशासाठी आणि समाजासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. दलित व पिडीत यांच्याविषयी त्यांच्या मनात अपार करूणा होती. महात्मा गांधीपासून प्रेरीत होवून विनोबाजींनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत सक्रीय सहभाग घेतला. राष्ट्र विकासाच्या उभारणीसाठी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्रोत्तर काळात विनोबा भावे यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या राष्ट्राप्रतीच्या भावभावना शुध्द आहेत. त्यांचे स्वातंत्र्य चळवळीतील कार्य असो वा सामाजिक, शैक्षणि ाक कार्य असो या प्रत्येक कार्यात विनोबा भावे यांची शारिरीक व बौध्दीक व्यक्तीमत्व विकासाची व राष्ट्रविकासाची झलक पाहावयास मिळते. गांधीजींच्या मृत्युनंतर त्यांचे अपूर्ण संकल्प पूर्ण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. स्वातंत्रोत्तर काळात विनोबांनी राष्ट्रउभारणीच्या विधायक कार्याला वाहून घेण्याचा निश्चय केला. त्यासाठी त्यांनी 'सर्वोदय' समाजाची स्थापना केली. विनोबाजींनी हिंदी भाषेची सेवा केल्याबद्दल त्यांना भारत सरकारने 'महात्मा गांधी पुरस्काराने' सन्मानित केले. तर सामाजिक सेवेबद्दल त्यांना 'मॅगसेस' पारितोषिक मिळाले. भारत सरकारने मरणोत्तर 1983 साली विनोबांना 'भारतरत्न' हा किताब देवून त्यांचा गौरव केला. आज जेव्हा जुन्या मुल्यांना गौणत्व आल्यासारखे दिसत आहे. अशा वेळेला कोटयावधी दुःखितांसाठी विनोबा भावेंनी केलेले कार्य व तत्वज्ञान समाजाला सदैव प्रेरणा देत राहील.

REFERENCES

डॉ. चोळकर पराग, सबै भूमि गोपाल की खंड–1, नवजीवन मुद्रणालय, अहमदाबाद 2010. भावे शिवाजी, विनोबा जीवनदर्शन, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई. नारगोलकर वसंत, साम्ययोगी विनोबा, भारतीय विद्याभवन, मुंबई, 1964. डॉ. चोळकर पराग, भूदान–ग्रामदान आंदोलन, आचार्यकुल, प्रकाशन, वर्धा 1997. भावे विनोबा, प्रेमपंथ अहिंसेचा, परंमधाम, प्रकाशन, पवनार, वर्धा 2005.